|| अंतरी पेटवू ज्ञानज्योत||

**कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव**

**Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon**

'A'Grade
NAAC Re-Accredited
(3rd Cycle)

**राष्ट्रीय सेवा योजना विभाग**

जा.क्र. कबचौउमवि/१४-क/रासेयो-०८/रेडरिबन/२१५ /२०१९ दि.२५/११/२०१९

**प्रति,**

**मा.प्राचार्य,**

जळगाव जिल्हा रा.से.यो. एकक असलेले महाविद्यालये व

विद्यापीठ शैक्षणिक प्रशाळा विभाग यांना

**विषय :-** महाविद्यालय रेडरिबन क्लबच्या अनुदानासंदर्भात..

**संदर्भ:- १)** मराएनिसं,मुंबई यांचे जा.मराएनिसं/विद्यापीठ/आयईसी/१९-२०/४०४८-४०९३ दि.३१/०५/२०१९ रोजीचे सहपत्र.

२) जा.क्र. कबचौउमवि/१४-ख/ रासेयो/रेडरिबन-४०/१०५/२०१९ दि. ०४/०७/२०१९

३) जा.क्र.सारुज/डापकु/जाएड्सदिन/२०१९-२०/७७७-८० दि. २०/११/२०१९ चे पत्र...

महोदय/महोदया,

महाराष्ट्र राज्यातील विद्यापीठांतर्गत नियमीत शिक्षण घेणा-या विद्यार्थ्याच्या मदतीने समाजातील इतर घटकांना HIV-AIDS संदर्भात माहिती देण्यासाठी तसेच या रोगाचा प्रसार रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाय म्हणून महाराष्ट्र राज्य एड्स नियंत्रण कक्षाच्या वतीने विद्यापीठाशी संलग्नीत महाविद्यालयांमध्ये रेड रिबन क्लब स्थापन करण्याचे निर्देश होते त्यान्वये कार्यवाही करण्यासंदर्भात संदर्भीय परीपत्रक २ अन्वये आपणास कळविण्यात आलेले आहे.

प्रस्तुत अनुषंगाने आपणास कळविण्यात येते की, आपल्या क्लब मार्फत २०१९-२० या आर्थिक वर्षात विद्यार्थी वर्गामध्ये एचआयव्ही/ एड्सविषयी जनजागृती करण्याच्या उद्देशाने व्याख्यान व मार्गदर्शन शिबिरे घेऊन ऐच्छिक तपासणी व Treat All या विषयी त्यांना मार्गदर्शन करण्यात यावे तसेच पथनाट्य/ पोस्टर प्रदर्शन/ मानवी साखळी/ रांगोळी स्पर्धांचे आयोजन करण्यात यावे तसेच आपल्याकडील विविध कार्यक्रम/ स्पर्धा/ उपक्रम यामध्ये सुध्दा एचआयव्ही/ एड्सविषयी जनजागृती करण्यात यावी.

रेड रिबिन क्लबकरीता नॅको,नवी दिल्ली यांचे मार्गदर्शक सुचनांन्वये सदर रेड रिबन क्लब करीता महाराष्ट्र राज्य एड्स नियंत्रण सोसायटी, मुंबई यांचेकडून २०१९-२० मधे प्रति महाविद्यालय रु. ४,०००/- प्रमाणे अनुदान आपणास जिल्हा एड्स प्रतिबंध व नियंत्रण विभाग ,जिल्हा सामान्य रुग्णालय,जळगाव यांचे कडून अदा करण्यात आल्याचे त्यांनी संदर्भीय पत्र क्रं.०३ अन्वये कळविले आहे. तरी राष्ट्रीय उपक्रमामध्ये महाविद्यालयाव्दारे परिपूर्ण सहकार्य करावे. आपल्या रेड रिबिन कल्बचा फलक महाविद्यालयाच्या मुख्य प्रवेशव्दाराजवळ लावावा. तसेच अधिक माहितीकरीता जिल्हा एड्स प्रतिबंध व नियंत्रण कक्ष,जळगाव तसेच मराएनिसं यांचेशी दुरध्वनी/ई-पध्दतीन संपर्क करावा.(सोबत सहपत्रक जोडलेले आहे.)

कृपया एच.आय.व्ही / एड्स (HIV/AIDS)आजाराचे देश व राज्यातून उच्चाटन करण्याकरिता आपल्या सहकार्याने येणाऱ्या नविन पिढीला एचआयव्ही संसर्ग मुक्त बनवून **निरोगी भारत -स्वस्थ भारत** करुया,आपण सहकार्य व योगदान द्याल,अशी अपेक्षा करतो,

कळावे.

आपला विश्वासू,

**(प्रा.डॉ.पंकजकुमार शां.नन्नवरे)**
संचालक, राष्ट्रीय सेवा योजना

**प्रत माहितीसाठी :-**

१) विभाग प्रमुख, कुलगुरु कार्यालय,२)विभाग प्रमुख, प्र-कुलगुरु कार्यालय,३)विभाग प्रमुख, कुलसचिव कार्यालय,४)विभाग प्रमुख,वित्त विभाग,५)मा.जिल्हा शल्य चिकित्सव तथा सचिव, जिल्हा एड्स प्रतिबंधक नियंत्रण विभाग, सामान्य रुग्णालय, जळगाव

# महाराष्ट्र शासन

MSACS

## जिल्हा एड्स प्रतिबंधक व नियंत्रण विभाग, जिल्हा सामान्य रुग्णालय, जळगांव.

DAPCU

भ्रमणध्वनी : ८६२३०६७८४६, ९४०४७७९७००, कार्यालय : ०२५७ - २२३३०९१, फॅक्स : ०२५७ - २२३२३९०

Email ID – dsjalgaon@mahasacs.org, dpojalgaon@mahasacs.org


आरोग्य सेवा

जा.क्र.सारुज/डापकु/जाएड्सदिन/२०१९-२०/७७७-८०

दि. 20 NOV 2019

प्रती,

मा.कुलगुरु सो.,

कवियत्री बहिणाबाई चौधरी

उत्तर महाराष्ट्र विदयापीठ, जळगाव.

**विषय** :- महाविदयालयीन रेड रिबन क्लबच्या अनुदानाबाबत...

**संदर्भ** : १.मा.उपसंचालक (आयईसी), महाराष्ट्र राज्य एड्स नियंत्रण सोसायटी, मुंबई यांचे मार्गदर्शकस सूचना

२. नॅको, नवी दिल्ली यांचे मार्गदर्शक सूचना.

महोदय,

उपरोक्त संदर्भिय विषयान्वये एचआयव्ही संसर्गितांसाठी सेवा सुविधा व सकारात्मक जीवनशैली, एचआयव्हीमुळे देशाच्या विकासावर होणारा परिणाम तसेच एचआयव्ही संदर्भात युवावर्गाची भूमिका व जबाबदारी व औषधोपचार अशा अनेक गहन मुददयांबाबतची माहिती महाविदयालयीन युवकांना विविध कार्यक्रमाच्या माध्यमातून जास्तीत जास्त युवावर्गापर्यत पोहचण्याच्या उददेशाने जळगाव जिल्हयातील एनएसएस विभागांतर्गत रेड रिबन क्लबची स्थापना करण्यात आलेली आहे. संदर्भ क्र २ नुसार नॅको, नवी दिल्ली यांचे मार्गदर्शक सुचनान्वये सदर क्लबकरिता प्रति महाविदयालय चालु आर्थिक वर्षात (सन २०१९-२०) जिल्हयातील ६० रेडरिबन क्लबला प्रत्येकी ४०००/- रु ऐवढे **अनुदान प्रत्येक महाविदयालयाच्या रेड रिबन क्लबच्या बॅंकखातेवर जिल्हा एड्स प्रतिबंधक व नियंत्रण विभाग, सामान्य रुग्णालय, जळगाव यांचे मार्फत वर्ग** करण्यात आलेले आहे. सदरील अनुदानमधुन महाविदयालायात एड्स विषयक जनजागृतीपर विविध कार्यक्रमाचे आयोजन करणेबाबत स्वतंत्र मार्गदर्शक सूचना या कार्यालयाकडून संबधित महाविदयालयास निर्गमित करण्यात आलेल्या आहेत. सदर मार्गदर्शक सूचनेप्रमाणे प्रत्येक महाविदयालयाने एचआयव्ही/एड्स विषयक जनजागृतीपुर्वक कार्यक्रम करण्यात यावे. जेणकरुन महाविदयालयातील जास्ती-जास्त युवकांना जास्तीत-जास्त माहिती प्राप्त होईल. महाविदयालयात कार्यक्रम घेतांना त्यात पोस्टर प्रदर्शन, व्याख्यान, मानवी साखळी, चलचित्रफित आदीचा समावेश असावा. तसेच स्थानिक स्थरावर रुग्णालयातील आयसीटीसी केंद्राशी समन्वय करुन कार्यक्रमाची पूर्तता करण्याबाबत नियोजन करण्यात यावे.

तरी आपण आपल्या अधिपत्याखालील जळगाव जिल्हयातील महाविदयालयानां सदरील अनुदानातून एचआयव्ही/एड्स विषयक जनजागृतीपर कार्यक्रम राबविण्याबाबत आपल्या स्तरावरुन आदेशित करावे. जेणेकरुन एचआयव्ही/ एड्स बाबतची माहिती जास्तीत जास्त युवा वर्गापर्यत पोहचवता येईल. या निमित्ताने हा राष्ट्रीय कार्यक्रम यशस्वी करण्यास आपले मोलाचे सहकार्य लाभेल.

जिल्हा शल्य चिकित्सक तथा सचिव,

जिल्हा एड्स प्रतिबंध व नियंत्रण समिती

जिल्हा सामान्य रुग्णालय, जळगाव.


कवयित्री बहिणाबाई चौधरी

उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव

राष्ट्रीय सेवा योजना विभाग

20 NOV 2019

1208


प्रत माहितीसाठी सविनय सादर :-

१. मा. प्रकल्प संचालक, महाराष्ट्र राज्य एड्स नियंत्रण सोसायटी, मुंबई

२. मा.जिल्हाधिकारी, जळगाव

३. समन्वयक, एनएसएस विभाग, उत्तर महाराष्ट्र विदयापीठ, जळगाव

४. प्राचार्य, सर्व महाविदयालय जि.जळगाव.

KKA

सर्व रासेयो एककांना पत्र पाठवावे